Mail id - aditiexpress33@gmail.com
22 AUG 25-1_page-0004
22 Aug 2025
दैनिक
अदिती एक्सप्रेस
Website: www.aditiexpress.in epaper.aditiexpress.in

# श्री कुमारस्वामी महाविद्यालय सायबर सुरक्षा कार्यशाळा संपन्न : विद्यार्थ्यांना मिळाली नवी दिशा



**दै. अदिती एक्सप्रेस**

लातूर/प्रतिनिधी : डिजिटल युगात वाढत्या सायबर जोखमींवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने औसा येथील श्री कुमारस्वामी महाविद्यालयात राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेत 'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सोप्या उदाहरणांद्वारे मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा जबाबदारीने वापर, अनोळखी लिंक व फिशिंग मेसेज ओळखण्याचे तंत्र, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे मार्ग, तसेच ऑनलाइन बँकिंग व डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची आवश्यक काळजी अशा महत्त्वाच्या बाबींची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

सायबर फसवणूक अथवा गुन्हा झाल्यास घाबरून न जाता तक्रार नोंदविण्याचे म हत्त्वही अधोरेखित करण्यात आले. यासाठी हेल्पलाईन क्रमांक १९३० व ऑनलाईन तक्रार पोर्टलचा योग्य वापर कसा करायचा याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.

या कार्यक्रमाला म हाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुसुम ढोणे तसेच प्राध्यापक डॉ. प्रसाद कदम, डॉ. सुभाष इंदलकर, प्रा. रवि जाधव, प्रा. मधुकर कदम व प्रा. शिवराज मिटकरी आदि उपस्थित होते. कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा उत्स्फ ूर्त सहभाग दिसून आला. शिक्षकवर्ग व आयोजकांनी सम ाधान व्यक्त करताना सांगितले की, या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांम ध्ये डिजिटल जबाबदारीची जाणीव वाढली असून ते आता इंटरनेटचा सुरक्षित व सजग वापर करतील. तांत्रिक माहितीपुरती मर्यादा न ठेवता, ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना डिजिटल नागरिक म्हणून जबाबदार वागण्याची प्रेरणा देणारी ठरली.